13

13 D/ Chetule sir/ Aadesh

# उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली, तालुका कल्याण यांचे कार्यालय

तर्टे प्लाझा, अनेक्स शीतल, गांधी नगर, डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण, जि. ठाणे.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये आदेश

जा. क्र. उपनि/ डोंबिवली/ बी-३/का. क. ८३/ ८५४ /२०१५.
दि. २४/०७/२०१५.

वाचावे:- १) श्री. एकनाथ सावंत व इतर ४ यांचा तक्रार अर्ज प्राप्त दिनांक २४/०३/२०१५
२) या कार्यालयाचे जा. क्र. उपनि/ डोंबिवली/ बी-३/ तक्रार/ १७९/सन २०१५ दि. ३०/०४/२०१५
३) संस्थेच्या पदाधिकाऱ्याचे पत्र दि. २९/०५/२०१५
४) या कार्यालयाचे सूनावणी पत्र दि. ०३/०६/२०१५
५) या कार्यालयात झालेल्या सुनावण्या दि. २२/०६/२०१५, १६/०७/२०१५, २०/०७/२०१५
६) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ मधील तरतूद.

---

ज्याअर्थी ओम गजानन पूजा को- ऑप. हौसिंग सोसायटी मर्या, ठाकूरवाडी, काळूनगर, डोंबिवली (प) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविलेली सहकारी संस्था असून तिचा नोंदणी क्र. टी. एन. ए/ के. एल. एन/ (टिसी)/१८७४६/२००७-२००८/ दि. १४/०६/२००७ असा आहे. आणि,

ज्याअर्थी, सदर संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनूसार व हौसिंग संस्थेच्या उपविधीमधील तरतूदी अन्वये करणे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी वाचावे क्र. १ नूसार संस्थेतील सभासद श्री. एकनाथ सावंत व इतर ४ यांनी संस्थेतील पदाधिकाऱ्याच्या कामकाजाबाबत १ ते १९ मूद्यासह लेखी तक्रार या कार्यालयास केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी वाचावे क्र. २ नूसार या कार्यालयाकडून तक्रारीस अनूसरून संस्थेकडून खूलासा मागविण्यात आला आहे. व संस्थेने या कार्यालयास वाचावे क्र. ३ नूसार दि. २९/०५/२०१५ रोजी खूलासा सादर केलेला आहे.

ज्याअर्थी संस्थेने सादर केलेला खूलासा आणि तक्रार अर्ज यांचे वाचन केले असता बरेच बाबतीत तफावत आढळून येत असल्याने वाचावे क्र. ४ नूसार या कार्यालयाने तक्रारदार व पदाधिकारी यांची संयूक्त सूनावणी आयोजीत केली होती व वाचावे क्र. ५ नूसार या कार्यालयास दिनांक २२/६/२०१५, १६/०७/२०१५, २०/०७/२०१५ अन्वये सूनावण्या घेण्यात आल्या आहेत. मात्र सदर सुनावणी दरम्यान संस्थेने काहीही उत्तर दिले नाही.

ज्याअर्थी तक्रारीत नमूद केलेले मूद्दे, संस्थेच्या पदाधिकाऱ्यानी सादर केलेला खूलासा या बाबीवरून अधिक चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ (२) मधील तरतूदीनूसार सोबतच्या परीशीष्ट 'अ' मधील मुद्याबाबत चौकशी होणे आवशक असल्याची खात्री झाल्यावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

30/07/2015

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी आर. जी गायकवाड, उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली, तालुका कल्याण, जि. ठाणे, ओम गजानन पूजा को- ऑप. हौसिंग सोसायटी मर्या, ठाकूरवाडी, काळूनगर, डोंबिवली (प), ता. कल्याण, जि. ठाणे या संस्थेची सोबतचे परीशीष्ट 'अ' मधील मूद्यासदंर्भात चौकशी करण्यासाठी श्री. एस. एस. तोटे निवृत्त विलेप■ लेखापरीक्षक यांची प्राधीकृत अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे. प्राधीकृत अधिकारी यांनी आदेशाचे दिनांकापासून ३ महिन्याचे आत चौकशीचे कामकाज पूर्ण करून चौकशीतील मूद्यासंदर्भात संस्थेचे काही आर्थीक नूकसान झाले आहे काय? याबाबत स्वंयस्पष्ट निष्कर्षासह अहवाल या कार्यालयास सादर करावा. चौकशीचे मानधन म्हणून रू ७,००० निश्चित करण्यात येत असून सदरचे मानधन संस्थेच्या निधीतून देण्यात येईल.

सदरचा आदेश माझे सही व शासन मुद्रेसह आज दिनांक २८/०७/२०१५ रोजी दिला आहे.

ठिकाण : डोंबिवली
दिनांक: २८/ ०७/२०१५

उपनिबंधक सहकारी संस्था, डोंबिवली, ता. कल्याण, जि. ठाणे.

(आर. जी. गायकवाड)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, डोंबिवली

30/07/15

Scanned by CamScanner